# प्रेस नोट

दि. २७/०७/२०१९

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग कडुन १ काडतची बंदक , ४ जिवंत काडतूसे सह आरोपीस यांस अटक.**

---

मा पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीत गेडाम सिंधुदुर्ग यांनी जिल्हातील चोरी , दरोडा, घर फोडी यांससारखे गुन्हे रोखण्यासाठी स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पी.एन.पाटील यांना दिलेल्या आदेशानुसार पोलीस उप निरीक्षक श्री. देसाई व त्यांचे पथकातील पोलीस हवालदार गुरुनाथ कोयंडे,पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल जाधव, पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद कामत असे दिनांक २६/०७/२०१९ रोजी ओरोस ,कणकवली , फोंडा असे रात्रौ पेट्रोलिंग करीत असताना दिनांक २७/०७/२०१९ रोजी ०१.०० वाजताचे सुमारास फोंडा बाजारपेठ येथील पेट्रोलपंपासमोरुन १ मोटार सायकल फोंडा येथून येते वेळी दिसली. सदर मोटार सायकल थांबवून चेक केली असता सदर मोटार सायकलचे पाठीमागे बसलेल्या इसम नामे सिध्देश सुनिल राणे वय-२८, रा.वाघेरी गावठणवाडी ता.कणकवली यांचेकडून १ विनापरवाना काडतूस बंदुक तसेच ४ जिवंत काडतूसे व १ प्लॅस्टिक चार्जिग बॅटरी व १ मोटारसायकल असा एकूण ७५,७३०/- किमतींचा मुद्देमाल आरोपीत यांचेकडून हस्तगत केला.

सदर बाबत कणकवली पोलीस ठाणे येथे आरोपीविरुध्द भारतीय हत्यार अधिनियम कलम १९५९ अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

दिक्षीत गेडाम
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग